**मराठा विद्या प्रसारक समाज**

**कर्मवीर शांतारामबापू वावरे कला , विज्ञान , वाणिज्य महाविद्यालय ,**

**उत्तमनगर सिडको नाशिक**

-----------------------------------------------------------------------------

-------------

# राष्ट्रीय सेवा योजना

# विशेष हिवाळी श्रम संस्कार शिबिर अहवाल

# सन२०१७ -२०१८

दि.१५ डिसेंबर २०१७

राष्ट्रीय सेवा योजना विशेष हिवाळी श्रम संस्कार शिबिराला प्रथम दिवस होता. सकाळी १०.०० वाजता महाविद्यालयातून गाडीने शिबिराचे साहित्य वं विद्यार्थी स्वंयसेवक शिबीर स्थळ गिरणारे त. जि. नाशिक येथे पोहचविण्यात आले. दुपारी १२.०० वाजता विद्यार्थानी स्वंयसेवक यांनागाडीने शिबीरास्थळी पोहचले. स्वयंपाकाचे साहित्य किचनरूम मध्ये व्यवस्थित ठेवले





गिरणारे गावातील ग्रामपंचायत कार्यालयात शिबिराचा उद्घाटन कार्यक्रम घेण्यात आला. त्या परिसराची स्वच्छता करण्यात आली. स्वंयसेवकांनी

स्वागतगीत, एन.एस.एस. गीताने कार्यक्रमाची सुरवात केली. प्राचार्य डॉ. दिलीप शिंदे यांनी स्वागत आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिराची माहिती दिली. राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिराची माहिती दिली. राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्व सांगून सात दिवसाच्या शिबीरास शुभेच्या दिल्या.कार्यक्रमाचे उद्घाटन म.वि.प्र. संचालक सचिन पिंगळे यांच्या हस्ते करण्यात आले. सरस्वती, संत गाडगेबाबा पूजनकरण्यात आले. तसेचटिकाव, फावडे, खराटा या साहित्याचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी मविप्र संचालक सचिन पिंगळे यांनी मनगट बळकट होण्यासाठी श्रमाची जोड आवश्यक आहे. श्रमदानाने मानवी मनाला शुद्धता येत असते विद्यार्थी व्यक्तिमत्व विकास होतो असे सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष मविप्र संचालक नानासाहेब महाले होते. याप्रसंगी मानवी जीवनात श्रमाला अनन्यसाधारण महत्व आहे. श्रमदानाच्या माध्यमातून अनेक विकासाची कामे मार्गी लागली आहेत. राष्ट्रीय सेवा योजनाच्या माध्यमातून घडलेले विद्यार्थी जीवनावर संस्कार घडविण्यासाठी मोलाचे व्यासपीठ आहे या माध्यमातून घडलेले विद्यार्थी भविष्यात आपल्या गावात, वस्तीत अनेक उपक्रम प्रयोग यशस्वीपणे राबवीत आहेत. श्रमदानाचे संस्कार असलेले युवा राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरातून घडत असल्याचे अध्यक्षीय मनोगतातून मांडले. पुंडलिकनाना थेटे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या उद्घाटन कार्यक्रम प्रसंगी गिरणारे गावच्या सरपंच श्रीमती अलकाताई दिवे,उपसरपंच श्री. तान्हाजी गायकर श्री. निवृत्ती घुले. श्री भावराज गायकर, ग्रामपंचायतसदस्य, महेंद्र थेटे, मंजुळाबाई गायकर, अंजनाबाई लीलके, विजय पोटींदे छबाबाई थेटे, सोसायटी सदस्य आत्माराम थेटे, बाळासाहेब गायकर, मुख्याधापक एस. ए. पाटील, श्री. बाळासाहेब हाडोटे शिवकार्य गडकोर्ट मोहीम, नाशिक श्री राम खुर्दळ उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्तविक राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख प्रा. निकम यांनी केले. तर सूत्रसंचालन प्रा.एस. टी. घुले, आभार डॉ. जयश्री जाधव यांनी मानले. महाविद्यालयाचे उपप्राचार्यसकाळ सत्र प्रमुख डॉ. नितीन पाटील. उपप्राचार्य एस. के. शिंदे, डॉ. किरण रकिबे. प्रा. शंकर राजोळे श्री राजाराम गायकर इत्यादी यावेळी हजर राहीले.

१६ डिसेंबर २०१७

राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमश्रमसंस्कार शिबिराला दुसरा दिवस एन. एस. एस. गीतप्रार्थना योग वर्गाने या दिवसाची सुरवात झाली. चहा, नाष्टा घेतल्यानंतर ९ ते १२.०० या ३ तासाचे श्रमदानाचे काम झाले. स्वंयसेवकांचे १० ग्रुप(समूह) तयार करण्यात आले.प्रत्येक समूहाला एक नेता वं त्यांचे सहभागी स्वंयसेवक असेसमूह बनविले. लक्ष्मीबाई समूहाकडे स्वयंपाक किचनची दिवस भराची जबाबदारी देण्यात आली. दुपारी १२.३० ते २.०० या वेळेत स्वंयसेवकाचे भोजन झाले. दुपारी ३.०० वा. प्रबोधन उपक्रमाची तयारी झाली.

फोटो:-





प्रबोधनाचे प्रमुख अतिथी श्री राम खुर्दळ अध्यक्ष शिवकार्य गडकोट मोहिम्म, नाशिक हे होते. दुर्ग संवर्धन, शिवकालीन दुर्ग याबबत शिवकालीन गडांची माहिती दिली. प्रमुख पाहुण्याचा परिचय कु. गणेशफडोळ तर सूत्रसंचालन कु. सीमा गोपचे आभार कु. प्रियंका येवले हिने करून दिले. नाशिक जिल्हयातील शिवकालीन गड-दुर्ग ऐतिहासिक लढाया त्याचे क्षेत्र,ठिकाणे, किल्ल्यांचेसरदार यांची माहिती उगवत्या शैलीत मांडली दुर्ग संवर्धनामध्येस्वंयसेवकांची भूमिका कशी महत्वाची आहे यांची माहिती दिली. दुर्गाचा इतिहास, भूगोल, पर्यावरण वं त्यांच्या संवर्धनाची माहिती दिली जाते. पर्यावरण जतन, दुर्गाची पडझड, दुरुस्ती केली जात असल्याची माहिती दिली. बाल शाहीर किरणमुसळे याने छत्रपती संभाजी राजाची माहिती शाहीर रूपाने दिली.

पाहुण्यांना वृक्षाचे रोप (पपई) भेट देण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. प्रा. एस. आर. निकम,प्रा. एस.टी. घुले, डॉ. जयश्री जाधव हे कार्यक्रमाला उपस्थित होते.





फोटो:-

दि. १७-१२-२०१७

राष्ट्रीय सेवा योजना विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीराचा तिसरा दिवस नियमित प्रमाणे एन.एस.एस. गीत, प्रार्थना, भक्तिगीते योगवर्ग यांनी दिवसाची सुरवात केली त्यानंतर चहा वं नाष्टा झाला. स्वंयसेवक समूहाला अहिल्याबाई बारव जलसंवर्धन, रस्त्याची साफसफाई, खंडोबा गडावर खड्डे खोदणे, मंदिराची परिसर ग्रामस्वच्छता करण्यात आली. स्वयंपाक वं दिवसभर किचनची जबाबदारी ‘सिंधूताईंच्या लेकी’ ग्रुपवर देण्यात आली. समुहाने आपली जबाबदारी उत्तम रितीने पार पाडली. दुपारच्या सत्रात भोजनानंतर प्रबोधन उपक्रमाची संपूर्ण जबाबदारी कु. तेजश्री पाटील वं शीतल निखाडे यांच्या जिमखाना ग्रुपकडे होती. विद्यार्थ्यांनी स्वयंसेवकांनी श्रमदानावेळी स्मशानभूमीची स्वछ्ता केली.

प्राचार्य डी.डी. आहेर महाविद्यालय कोपरगाव येथील उपस्थितीत होते. विद्यार्थाना आत्मनिर्भयता, स्व:विश्वासयोग्यताओळखणे, जीवनातीलयशासाठी स्व:तामध्ये आत्मविश्वास निर्माण करणे, आंतरिक शक्ती, प्रभाव जागृत करणे.
यांनी या विषयावर आपले व्याख्यान दिले





१८-१२-२०१७ :-

राष्ट्रीय सेवा योजना विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचा चौथा दिवस नियमित प्रमाणे एन.एस.एस.गीत ,प्रार्थना, भक्तिगीते योगवर्ग यांनी दिवसाची सुरवात केली. नंतर चहा व नाष्टा झाला.त्यांनतर ग्रामस्वच्छता, खंडोबा टेकडीवर वृक्षारोपन २५० वर्षापूर्वीची अहिल्याबाई होळकर बारवच काम हे N.S.S.विद्यार्थी गेले ७ दिवस मनापासून करत होते. रस्त्याची साफसफाई करण्यात आली. स्वयंपकाची जाबाबदारी ही गेले चार दिवसांपासूनउत्तमरीत्या मुले वं मुली करत होते वं त्यानंतर सगळे मुले वं मुली यांनी दुपारच्या जेवणाचा उत्तमरित्याआस्वाद घेतला.नंतर आत्मनिर्भरता तसेच व्यक्तिमत्व विकास यांसारखे सुंदर असे व्याख्यान हे आम्हाला ऐकायला मिळाले . नंतर सगळ्यांनी संध्याकाळी गाणे म्हटले नंतर वेगवेगळ्या पद्धतीची कार्यक्रम हे ७ दिवस घेण्यात आले. अनेक विद्यार्थी वं विद्यार्थिनीनी सूत्रसंचालन देखीळ केले.





१९-१२-२०१७

राष्ट्रीय सेवा योजना विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचा पाचवा दिवस नियमितप्रमाणे एन.एस.एस.गीत, प्रार्थना, भक्तीगीत, योगवर्गयागोष्टींनी दिवसाची सुरवात हीकरण्यात आली. नंतर सगळ्यांनी एकत्र बसून चहा प नाष्टा केला. नंतरसाफसफाईसाठी राजवाडा ते कृष्णा मंदिर पर्यंत साफसफाई करण्यात आली.

श्रमदान ३ तासर्सगळ्या मुलींनी उत्तमरित्या केले. तसेच मुलांनी अहिल्यादेवी बारव ही स्वच्छ केली. सिडको महाविद्यालयातील विद्यार्थांनी सूक्ष्म जीवशास्त्र विभागाच्या वतीने हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली. ग्रामस्थांची हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली. ज्यांचे हिमोग्लोबिन कमी आहेत त्यांना ते वाढविण्यासाठी सल्ला देण्यात आला. तसेच नंतर आलेल्या अतिथींचे स्वागत हे विद्यार्थांनी केले. वं आभार प्रदर्शन हे एका विद्यार्थाने केले.






२०-१२-२०१७

राष्ट्रीय सेवा योजना हिवाळी श्रमसंस्कारशिबीराचा सहावा दिवस दिवसाची सुरवात एन.एस. एस. गीत विद्यापीठ गीत, राष्ट्रभक्तीपर गीत, राष्ट्रगीताने झाली. नंतर चहा व नाष्टाचा सर्वांनी आस्वाद घेतला. वं दिलेल्या ठिकाणी श्रमदानाचे काम करून सर्व मुले व मुली हे एका ठिकाणी जमले वं तिथून आम्हाला नाना घुले यांच्या निवास स्थानी शिबिरातील सर्व विद्यार्थांना यांच्याकडून स्नेह भोजन देण्यात आले. तसेच कार्यक्रमात दुपारच्या वेळी जिल्हा समन्वयक प्रा रवींद्र अहिरे व पिंगळे सर यांनी भेट दिली. यानंतर आम्हाला व्याख्यान देण्यासाठी श्री,. मधुकर कड साहेब हे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, अंबड यांनी सायबर गुन्हेगारी वं प्रतिबंध या विषयावर व्याख्यान दिले त्यांचा परिचय व सूत्रसंचालन तसेच आभार प्रदर्शन देखील विद्यार्थांनी केले नंतर सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनी वं शिक्षकांनी एकत्र येऊन वेगवेगळे खेळ खेळले.




२१-१२-२०१७

राष्ट्रीय सेवा योजना हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचा सातवा दिवसाची सुरवात ही एन.एस.एस. गीताने झाली. त्यादिवशी समारोप प्रसंगी म.वि.प्र. संस्थेच्या सरचिटणीस निलीमाताई पवार या उपस्थित होत्या. त्याचबरोबर सात दिवस काम करून ज्या अहिल्या देवी होळकर बारवेच्या जीर्णोध्दाराचे उद्घाटन म . वि . प्र समाज संस्थेच्या सरचिटणीस श्रीमती निलिमाताई पवार यांच्या उपस्थित करण्यात आले . गिरणारे गावाच्या सरपंच अलकाताई दिवे या देखील होत्या. तसेच गिरणारे गावातील उपसरपंच, अनेक मान्यवर सिडको महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य इतर विद्यार्थी व विद्यार्थिनी या कार्यक्रमात सहभागी होत्या. तसेच विद्यार्थ्यांनी आपले मनोगत देखील मांडले.










(प्रा.सिताराम निकम)
रा.सो.या.कार्यक्रम अधिकारी



(डॉ. दिलीप शिंदे)
प्राचार्य